# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३**

## जलसंपदा विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ३४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: आय-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २७०१, मोठे व मध्यम पाटबंधारे**<br>**रूपये:- १८,९०,८३,४७,०००/-**<br>**श्री. चेतन तुपे** |
| (१) | ४९१२ | १० | हडपसर(पुणे)विधान मतदार विधानसभा मतदारसंघाच्या क्षेत्रातून जाणाऱ्या जलसंपदा विभागाच्या बंद पडलेल्या आणि वापरात नसलेल्या कालव्यांच्या दोन्ही बाजूंच्या भिंतीवर पक्के रस्ते उभारून हल्लीच्या वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून पर्यायी रस्ते उपलब्ध करण्याची आवश्यकता, शासनाचे करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ४९१५ | १० | हडपसर(पुणे) विधानसभा मतदारसंघाच्या क्षेत्रातून जाणाऱ्या जलसंपदा विभागाच्या कालव्यांच्या दोन्ही बाजूला बऱ्याच ठिकाणी झालेली लोकवस्ती,पुरेशा संरक्षक भिंती आणि कुंपणे नसल्यामुळे काही ठिकाणी कालव्यांच्या भिंती फुटून वस्त्यांमधून पाणी शिरून होत असणारे नुकसान, योग्य संरक्षक कुंपण नसल्यामुळे नागरिक विशेषता मुले आणि महिला घसरून कालव्यात पडून होत असणारे मृत्यू,इत्यादी बाबींना आळा घालण्यासाठी कालव्यांना योग्य प्रमाणात संरक्षण कुंपणे आणि भिंती घालण्याची आवश्यकता, शासनाचे करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (३) | ४९८८ | १० | मौजे धामापूर (तालुका-मालवण, जिल्हा-सिंधुदूर्ग) गावातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनींमध्ये भरतीच्या वेळी शेतात शिरणाऱ्या कर्ली खाडीच्या खाऱ्या पाण्यापासून संरक्षण करण्यासाठी गावातून वाहणाऱ्या पोईकालवा बंधाऱ्यावर प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करुन कायमस्वरुपी उघडझाप करणारी झडपे असलेला सिमेंट पक्काबंधारा बांधून देण्यासाठी मा.केंद्रीय सूक्ष्म, लघु मध्यम उद्योग मंत्री महोदयांनी तसेच, या भागातील नागरीकांनी (१) मा.जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग, (२) कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हापरिषद, सिंधुदूर्ग तसेच, (३) उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, मालवण यांचेकडे ऑक्टोबर, 2022 अखेर प्रत्यक्ष भेटून निवेदन देवून कायम स्वरुपी उघडझाप करणारा बंधारा बांधून देण्याची मागणी करणे, धामापूर गावातून वाहणाऱ्या पोईकालव्यावर ग्रामस्थांच्या मागणीप्रमाणे उघड-झाप कराणारी झडप बंधारा बांधून देण्यास अधिकाऱ्यांनी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | असमर्थता दर्शविणे, पावसाळयात समुद्राच्या उधाणामुळे, कर्ली खाडीच्या पूरामुळे गावकऱ्यांची शेती, फळबागायती, घरांना पावसाच्या पाण्याचा वेळेत निचरा न झाल्याने नुकसानास सामोरे जावे लागणार आहे. झडप असलेला पक्का सिमेंटचा बंधारा बांधून देण्याबाबत वारंवार मागणी करुनही शासनाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष. बंधारा बांधून देण्याच्या कामी शासनाकडून अद्याप काहीही कार्यवाही करण्यांत न आल्याने शासनाच्या निष्क्रीयतेमुळे या भागातील शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, परिणामी, धामापूर गावातून वाहणाऱ्या पोईकालव्यावर ग्रामस्थांच्या मागणीप्रमाणे उघड-झाप करणारी झडप बंधारा बांधून देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही वा तातडीची उपाययोजना. |
| (४) | ४९९२ | १० | "पालघर व डहाणू तालुक्यातील शेती सिंचनाची गरज भागवण्यासाठी सूर्या धरण जीवनदायी म्हणून ओळखले जात असणे, या प्रकल्पाच्या उजव्या व डाव्या तीर कालव्याची नियमित देखभाल दुरुस्ती अभावी दुरवस्था झालेली असणे, परिणामी शेतकऱ्यांना दुबार शेतीच्या सिंचनासाठी पाणी मिळत नसणे, यासंदर्भात शेतकऱ्यांनी कालव्याची दुरुस्ती करण्याची शासनाकडे केलेली मागणी, या मागणीकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, चिलार-बोईसर मार्गावरील खाजगी कारखान्यांनी अतिक्रमण करून कालव्यांच्या जागा हडप करून कालव्यांची केलेली नासधूस, पाटबंधारे विभागाकडे या विरोधात तक्रारी केल्यानंतर केवळ नोटीस बजावण्याच्या पलीकडे कोणतीही कारवाई करण्यात येत नसणे, यासंदर्भात सूर्या धरणाच्या उजवा व डावातील कालव्यांसह संलग्न असलेले शाखा कालवे व लघु पाठ यांची देखभाल दुरुस्ती करण्याची आवश्यकता, आणि देखभाल न केल्याने कालव्यालगत मोठ्या प्रमाणात वाढलेली झाडी झुडपे तसेच पावसाळयात डोंगरातून वाहून येणारी माती व गाळ नियमित साफसफाई न झाल्याने कालव्यात साचलेले असणे, त्यामुळे कालव्यातून पाणी जाण्यास अडथळा निर्माण होऊन सिंचनासाठी आवश्यक पाणी मिळत नसणे, परिणामी हजारो शेतकरी उन्हाळी भात शेती व बागायती पासून वंचित राहत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेले नाराजीचे वातावरण, या संदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (५) | ४९९७ | १० | "राज्यातील जलसंपदा विभागातील अनेक पदे रिक्त असून राज्यात विभागाच्या मार्फत मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असून विभागातील 14000 रिक्त पदांमुळे ही कामे प्रभावित होत असणे, ही पदे तातडीने भरण्याच्या संदर्भात शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबतीत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (६) | ५००० | १० | "खडकवासला धरणाच्या भिंतीपासून अवघ्या शंभर फूट अंतरावर महापालिकेची ३०३० मिलिमीटर व्यासाची जलवाहिनी सुरू होणे, तथापि यातून गळती होत असल्याचे कारण देत जलसंपदा विभागाने महापालिकेची पाणीपट्टी थेट दुप्पट केलेली असणे, जलसंपदा विभागाच्या खडकवासला धरण प्रकल्पातून पुणे शहराला होत असलेला पाणीपुरवठा, पूर्वी कालव्यांमधून सोडलेले पाणी पर्वती येथे पंप केले जात असणे, पण यामध्ये पाण्याचा अपव्य होत असल्याने बंद |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | जलवाहिनीतून पाणीपुरवठा सुरू झालेला असणे, महापालिकेने खडकवासला धरण स्थळ ते बंद जलवाहिनी हे अंतर कमी असताना देखील गळती शून्य असतानाही जलसंपदा विभागाकडून मोठ्या प्रमाणात पाणीपट्टी आकारली जात असल्याने याबाबतीत शासनाने महापालिकेने कालव्या मधून पाणी घेणे बंद केल्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता, जलसंपदा विभाग प्रत्येक 1000 लिटर साठी महापालिकेकडून 30 पैसे पाणीपट्टी आकारत असणे, धरणाच्या भिंतीपासून 30 मीटर अंतरावरून बंदिस्त जलवाहिनी सुरू होत असताना यामध्ये पाण्याचा अपव्यय होत असणे, या होत असलेल्या अपव्ययाकडे जलसंपदा विभागाचे होत असलेले दुर्लक्ष, या संदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना” |
| | | | **श्री. अनिल पाटील** |
| (७) | ४८७४ | १०० | जळगाव जिल्ह्यातील अमळनेरसह 5 तालुक्यांसाठी महत्त्वाचा असलेल्या निम्न तापी पाडळसे प्रकल्प गेल्या 25 वर्षांपासून रखडलेला असणे, 1997-98 मध्ये प्रशासकीय मान्यता मिळूनही प्रकल्प रखडल्याणे प्रकल्पाचा खर्च पाचपटीने वाढलेला असणे, प्रकल्प रखडल्यामुळे दरवर्षी 10,000 दशलक्ष घनमीटर पाणी वाहून जाणे, 420 दशलक्ष घनमीटर क्षमतेचा हा प्रकल्प पूर्ण झाल्यास 54936 हेक्टर क्षेत्राला लाभ होणार असणे, पाडळसे प्रकल्प स्थळावर सुरक्षेच्या कोणत्याही उपाययोजना नसणे, 29 डिसेंबर २०२२ रोजी वाळू, खडी, डांबर, माती, डिझेल, डीपी, लोखंड अशा 5 लाख रुपयांच्या साहित्याची चोरी होणे, तत्कालीन युती सरकारने या प्रकल्पासाठी नाबार्ड कडून 1500 कोटी कर्ज उपलब्ध झाल्याची घोषणा करणे मात्र ती फसवी ठरणे, या प्रकल्पासाठी सन 2020-21 आणि 2021-22 च्या अर्थसंकल्पात 200 हून अधिक कोटी रुपयांची तरतूद केलेली असणे, यातून किरकोळ कामे सुरू असणे मात्र धरणाच्या मुख्य पिलरचे काम अद्याप सुरू झालेले नसणे, सद्यस्थितीत प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता असणे त्यासाठी 5300 कोटी रुपये तरतूद करण्याची गरज, प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्याची गरज, याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. दिलीपराव बनकर** |
| (८) | ४८८१ | १० | कडवा कालवा विभाग, नाशिक अंतर्गत तळवाडे, पिंपळगाव निपाणी, महाजनपुर, भेंडाळी , श्रीरामपूर व औरंगपुर या ६ गावांसाठी कडवा कालव्याची पोटचारी काढून या पोटचारी द्वारे पाणी उपलब्ध करून देण्याची या परिसरातील शेतकऱ्यांची असलेली मागणी. या मागणीच्या अनुषंगाने तसा प्रस्ताव तयार करण्याचे आदेश मा.मुख्य अभियंता, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक यांना दिलेले असणे. सदरची गावे हि दुष्काळ सदृश्य असणे या गावांना पोटचारी द्वारे पाणी उपलब्ध झाल्यास परिसरातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सुटण्यास निश्चित च मदत होणार असणे. परंतु या बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (९) | ४८८७ | १० | नांदुरमध्यमेश्वर (ता.निफाड, जि.नाशिक) येथील नांदूरमध्यमेश्वर बंधाऱ्यास १० वक्राकार नवीन गेट बसविण्याची मागणी तसेच त्यासाठी निधीची तरतूद करणेची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे सन २०२०-२१ मध्ये शासनाकडे केलेली असणे. त्यानुसार वक्राकार गेटच्या कामासाठी शासनाने सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय वार्षिक आखणीमध्ये रु. ५७ कोटीची तरतूद केलेली असणे. सदरच्या प्रकल्पास शासनाने दि. १४.१०.२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये तत्वतः मान्यता दिलेली असणे. सदर प्रकल्पाच्या कामास अद्यापही प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शासनाचे होत असलेली दुर्लक्ष शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (१०) | ४९७० | १० | नाशिक जिल्ह्यातील पार-गोदावरी उपसा जोड योजना क्र. ३ व ४ मंजुरीबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे दि. ३ नोव्हेंबर २०२२ व दि. २१ जानेवारी २०२३ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मागणी केलेली असणे,पश्चिम वाहीनी पार नदीचे महाराष्ट्राच्या पाणलोट क्षेत्रातील पाणी पश्चिमेकडे समुद्राला वाहून जात असणे, उपसा जोड योजना क्र. ३ व ४ या दोन्ही कमी उंचीच्या योजनांद्वारे ५०० मी. तलाकांच्या वरील हे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचे प्रस्तावित असणे, या योजनांमधील धरणे एकमेकांशी नैसर्गिक उताराने बोगदा व बंद नलीकांद्वारे जोडून मध्यवर्ती धरणाच्या पाणीसाठ्यातून पाण्याचा उपसा करण्याचे नियोजन असणे, सर्व धरणे एकमेकांस समान संचय पातळीत जोडण्यात येणार असल्यामुळे या सर्व साठ्यांचे एकात्मिक जलनियोजन त्यामुळे शक्य होणार असणे, उपसा योजना क्र. ३ द्वारे ३७.३२ दलघमी पाणी उपसा करून मांजरपाडा धरणासाठी बांधलेल्या बोगद्याद्वारे गोदावरी खोऱ्यात आणले जाणार असणे, या बोगद्याचा पूर्ण क्षमतेने वापर होवून गोदावरी खोऱ्यातील पाण्याची तुट भरून निघणार असणे, तर उपसा योजना क्र. ४ द्वारे ३६.०७३ दलघमी पाणी उपसा करून करंजवन धरणात आणले जाणार असणे, दोन्ही योजनांमधील १४.०७% पाणी स्थानिक वापरासाठी राखीव ठेवले जाणार असणे, या योजनेचा सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल राज्य तांत्रिक सल्लागार समितीकडे दि. ३०/७/२०२१ च्या पत्रान्वये मंजुरीसाठी सादर केलेला असणे, गोदावरी खोऱ्यातील पाण्याची तुट भरून काढण्यासाठी उपसा जोड योजना क्र. ३ व ४ योजनेची अतिशय आवश्यकता असणे,त्याचप्रमाणे ७.१३ टीएमसी चा दमणगंगा- वैतरणा-गोदावरी आणि ५ टीएमसी चा दमणगंगा -एकदरे तसेच १०.७६ टीएमसी चा नार-पार -गिरणा नदी जोड प्रकल्प लवकरात लवकर हाती घेण्याची मागणी असणे, नाशिक जिल्ह्यातील काही दुष्काळग्रस्त तालुके त्याचबरोबर दुष्काळग्रस्त मराठवाडा आणि गिरणा उपखोऱ्यासाठी हे राज्यांतर्गत महत्वकांक्षी प्रकल्प राबविण्याची नितांत आवश्यकता असणे,या भागातील दुष्काळावर मार्ग काढण्यासाठी या योजना राबविणे आवश्यक असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ४९७५ | १० | येवला तालुक्यातील लघुपाटबंधारे तलावांची दुरुस्ती व डोंगरगाव कालव्याची |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | दुरुस्ती करणे या कामांना मंजुरी मिळण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. २१ जानेवारी २०२३ रोजी पालखेड पाटबंधारे विभागाकडे मागणी केलेली असणे, ल.पा.तलाव डोंगरगाव, ल.पा.तलाव सावरगाव आणि ल.पा.तलाव खिर्डीसाठी ता.येवला या योजनांची दुरुस्ती आणि डोंगरगाव कालव्याची गळती थांबविण्यासाठी विशेष दुरुस्ती कामांबाबत कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ४९८१ | १० | किकवी पेयजल प्रकल्प ब्राम्हणवाडे ता.त्र्यंबकेश्वर जि.नाशिक या प्रकल्पाच्या कामाला सुधारित प्रशासकीय मान्यता देवून या प्रकल्पाचे काम सुरु करण्याची नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी दि. १८ सप्टेंबर २०२२ व दि. ६ फेब्रुवारी २०२३ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे, नाशिक जिल्ह्यातील गंगापूर धरण पूर्ण होऊन ६५ वर्षे झाल्यामुळे त्यामध्ये गाळ साठा मोठ्या प्रमाणात झाला असणे, सन २००२ मधील मेरीच्या अहवालानुसार गंगापूर धरणाच्या जिवंत साठ्यामधून ४३.७४९ दलघमी इतका साठा कमी झाला असणे, गंगापूर धरणाचा साठा पुनर्स्थापित करण्यासाठी या धरणाच्या उर्ध्व बाजूस किकवी नदीवर ७०.३६ दलघमी क्षमतेचे (६०.०२ दलघमी उपयुक्तसाठा) नवीन धरण बांधण्याचे प्रस्तावित असणे, सदर योजनेच्या रुपये २८३.५४ कोटी खर्चास दि.२६ ऑगस्ट २००९ अन्वये शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली असणे,या प्रकल्पासाठी आवश्यक असलेली १७२.४६८ हेक्टर पर्यायी वनजमीन दि. २८ डिसेंबर २०१० अन्वये वनविभागाकडे वर्ग करण्यात आलेली असणे, वनजमीन हस्तांतरण प्रस्तावास भारत सरकार पर्यावरण आणि वन विभागाकडून दि. २८ फेब्रुवारी,२०१४ अन्वये तत्वतः मान्यता मिळालेली असणे, सदर प्रकल्पाच्या बांधकामासाठी त्र्यंबकेश्वर तालुक्यातील १० गावातील ७३४.५४२ हेक्टर खाजगी जमिनीच्या भूसंपादनासाठी संयुक्त मोजणी पूर्ण झालेली असून भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर असणे,केंद्र शासनाकडून या प्रकल्पाच्या पर्यावरण प्रस्तावास दि.२९ सप्टेंबर २०१४ अन्वये मान्यता मिळालेली असणे,या प्रकल्पामुळे नाशिक शहराच्या मधून वाहत असलेल्या गोदावरी नदीचे पूरनियंत्रण, ०.५० मे.वॅट वीजनिर्मिती त्याचबरोबर आदिवासी क्षेत्रात सिंचन व पिण्याच्या पाण्याचा अप्रत्यक्ष लाभ होणार असणे,या कामाचे कार्यारंभ आदेशसुद्धा देण्यात आलेले असणे, मात्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या चौकशी यादीमध्ये सदर प्रकल्पाचा समावेश असल्यामुळे कंत्राटदाराबरोबरचा निविदा करार दि. ३ डिसेंबर,२०१६ रोजी स्थगित करण्यात आलेला असणे, जायकवाडी प्रकल्पाच्या उर्ध्व भागामध्ये नव्याने साठे निर्माण करण्यास प्रतिरोध करण्यासाठी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे दि. १७ ऑक्टोंबर,२०१३ रोजी जनहित याचिका दाखल असणे, मात्र दि.३० नोव्हेंबर २०१७ रोजी मान्यता मिळालेल्या गोदावरी खोऱ्याच्या जल आराखड्यातील खंड क्र. २ पृष्ट क्र.२७९ आणि अ.क्र.१५१ वर या प्रकल्पाचा समावेश असणे, सन २०१५-१६ च्या दरसूचीनुसार या प्रकल्पाची अद्ययावत किंमत ७८६.५० कोटी असणे, प्रकल्पाच्या बांधकामास निधी उपलब्ध झाल्यास |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | चार वर्षात प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन असणे,किकवी पेयजल प्रकल्पासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन या प्रकल्पाचे काम सुरु करणेबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ४९९८ | १० | विंचूर ता.निफाड जि.नाशिक येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या प्रांगणातील पालखेड डावा कालवा सा.क्र. ५६५६५ मी ते ५६६७२ मी.मध्ये पुलाचे बांधकाम व स्लॅबचे बांधकाम करणेबाबत मागणी असणे, विंचूर ता.निफाड जि.नाशिक येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या प्रांगणातील पालखेड डावा कालवा सा.क्र. ५६५६५ मी ते ५६६७२ मी.मध्ये पुलाचे बांधकाम व स्लॅबचे बांधकाम करणे हे काम मार्गी लावण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांनी सचिव, जलसंपदा विभाग,मुंबई यांचेकडे दि. १८ डिसेंबर २०२२ रोजी वा त्या सुमारास मागणी केलेली असणे, या कामासाठी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांनी सचिव,जलसंपदा विभाग,मुंबई यांना दि. २१ एप्रिल २०२२ रोजी सविस्तर प्रस्ताव पाठवलेला असणे, विंचूर ता.निफाड जि.नाशिक येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या प्रांगणातील पालखेड डावा कालवा सा.क्र. ५६५६५ मी ते ५६६७२ मी.मध्ये पुलाचे बांधकाम व स्लॅबचे बांधकाम करणे हे काम मंजूर करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. दिलीप वळसे-पाटील** |
| (१४) | ४८८३ | १० | “पुणे जिल्हयातील कलमोडी (आरळा) मध्यम प्रकल्पास दिनांक 30 एप्रिल, 1997 साली प्रथम प्रशासकीय मान्यता मिळालेली असून सन 2009 पासून धरणात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करण्यात येत आहे. तथापि, या प्रकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या सातगाव पठार उपसा सिंचन योजनेस सुधारीत प्रशासकीय मान्यता अद्यापही न दिल्यामुळे 5065 हेक्टर सिंचन क्षेत्र अद्यापही निर्मित झाले नाही. लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी करुनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही न करणे, परिणामी या परिसरातील जनतेमध्ये शासनाप्रती असंतोष व निराशेचे वातावरण तयार होणे, याबाबत शासनाने तातडीने प्रकल्पास सुधारीत प्रशासकीय मान्यता देवून निधी देण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” |
| (१५) | ४८८४ | १० | “पुणे जिल्हयातील कुकडी पाटबंधारे प्रकल्पास तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून यामध्ये आंबेगाव, जुन्नर व शिरुर तालुक्यातील कुकडी प्रकल्पाशी संबंधित विषयाबाबत साधरणत: 1990 सुमारास घोड, मीना व कुकडी नदीवर 65 कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधण्यात आलेले आहेत. या बंधा-यांचा कुकडी प्रकल्पामध्ये समावेश  करण्याबाबत लोकप्रतिनिधींची मागणी असतानाही अद्याप त्यांचा समावेश करण्यात न येणे व निधींची उपलब्धता न करणे, यामुळे जुन्नर, आंबेगाव व शिरुर या तालुक्यातील जनतेमध्ये पसरलेला असंतोष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” |
| | | | **मागणी क्रमांक: आय-३** |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मुख्य लेखाशीर्ष: २७०२, लहान पाटबंधारे**<br>**रूपये:- ६८,५७,०००/-**<br>**श्री. दिलीपराव बनकर** |
| (१६) | ४८८९ | १० | कडवा कालवा विभाग, नाशिक अंतर्गत तळवाडे, पिंपळगाव निपाणी, महाजनपुर, भेंडाळी , श्रीरामपूर व औरंगपुर या ६ गावांसाठी कडवा कालव्याची पोटचारी काढून या पोटचारी द्वारे पाणी उपलब्ध करून देण्याची या परिसरातील शेतकऱ्यांची असलेली मागणी. या मागणीच्या अनुषंगाने तसा प्रस्ताव तयार करण्याचे आदेश मा.मुख्य अभियंता, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक यांना दिलेले असणे. सदरची गावे हि दुष्काळ सदृश्य असणे या गावांना पोटचारी द्वारे पाणी उपलब्ध झाल्यास परिसरातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सुटण्यास निश्चितच मदत होणार असणे. परंतु या बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. दिलीप वळसे-पाटील** |
| (१७) | ४८८८ | १० | "पुणे जिल्हयातील आंबेगाव तालुक्यातील लोणी व धामणी परिसरास सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावे म्हणून प्रस्तावित असलेल्या म्हाळसाकांत उपसा सिंचन योजनेचे सर्वेक्षणाचे काम अद्यापही पूर्ण न होणे, त्यामुळे हा संपूर्ण परिसर सिंचनाअभावी वंचित असणे, लवकरात लवकर या उपसा सिंचन योजनेचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण करुन या योजनेस प्रशासकीय मान्यता देणे व त्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक असतानाही, याबाबत शासनाचे झालेले दुर्लक्ष, यामुळे परिसरामधील जनतेमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." |
| (१८) | ४८९० | १० | "पुणे जिल्हयातील आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागातील गावांना शेतीसाठी पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत वरदान ठरणा-या बोरघर व फुलवडे या प्रस्तावित उपसा सिंचन योजनांचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झालेले असून या योजनांना अद्याप प्रशासकीय मान्यता व निधीची उपलब्धता न केल्यामुळे पाण्यापासून वंचित राहिलेल्या आदिवासी भागातील गावांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१९) | ४९५१ | १० | सातारा जिल्हयात मोठया प्रमाणावर पाण्याची टंचाई निर्माण होत असणे, त्याचप्रमाणे जावळी तालुक्यात पिण्याच्या पाण्याचा टंचाईचा प्रश्न निर्माण झाला असणे, वर्षानवर्षे प्रलंबित असणे, पाणी टंचाई दूर करण्यासाठी शासनाने मौ.वडारवा धरण प्रकल्प उभारण्यात यावा, अशी मागणी स्थानिक रहिवाशांनी केला असणे, वडारवा धरणामुळे शेतकऱ्यांच्या जमीनी व ग्रामस्थ प्रकल्प बाधित होणार नसणे, त्यामुळे पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होत नसणे, पिण्याच्या पाण्याची टंचाई व शेतीला पाणी मिळणार असणे, त्यामुळै सदरचे धरण होणे अत्यंत गरजेचे असणे, शासनाने प्रकल्पास मंजूरी दिली असणे, मात्र अद्याप काम सुरु झाले नसणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|

जलसंपदा विभागाच्या कार्यालयाकडून ट्रायल पिट घेण्यास टाळाटाळ होत असणे, धरणाचे काम तातडीने सुरु करण्याची आवश्यकता असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी शेतकऱ्यांत व ग्रामस्थांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना.

(२०) ४९५६ १० मौजे धामापूर (तालुका-मालवण, जिल्हा-सिंधुदुर्ग) गावातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनींमध्ये भरतीच्या वेळी शेतात शिरणाऱ्या कर्ली खाडीच्या खाऱ्या पाण्यापासून संरक्षण करण्यासाठी गावातून वाहणाऱ्या पोईकालवा बंधाऱ्यावर प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करुन कायमस्वरुपी उघडझाप करणारी झडपे असलेला सिमेंट पक्काबंधारा बांधून देण्यासाठी मा.केंद्रीय सूक्ष्म, लघु मध्यम उद्योग मंत्री महोदयांनी तसेच, या भागातील नागरीकांनी (१) मा.जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग, (२) कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हापरिषद, सिंधुदूर्ग तसेच, (३) उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, मालवण यांचेकडे ऑक्टोबर, 2022 अखेर प्रत्यक्ष भेटून निवेदन देवून कायम स्वरुपी उघडझाप करणारा बंधारा बांधून देण्याची मागणी करणे, धामापूर गावातून वाहणाऱ्या पोईकालव्यावर ग्रामस्थांच्या मागणीप्रमाणे उघड-झाप कराणारी झडप बंधारा बांधून देण्यास अधिकाऱ्यांनी असमर्थता दर्शविणे, पावसाळयात समुद्राच्या उधाणामुळे, कर्ली खाडीच्या पूरामुळे गावकऱ्यांची शेती, फळबागायती, घरांना पावसाच्या पाण्याचा वेळेत निचरा न झाल्याने नुकसानास सामोरे जावे लागणार आहे. झडप असलेला पक्का सिमेंटचा बंधारा बांधून देण्याबाबत वारंवार मागणी करुनही शासनाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष. बंधारा बांधून देण्याच्या कामी शासनाकडून अद्याप काहीही कार्यवाही करण्यांत न आल्याने शासनाच्या निष्क्रीयतेमुळे या भागातील शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, परिणामी, धामापूर गावातून वाहणाऱ्या पोईकालव्यावर ग्रामस्थांच्या मागणीप्रमाणे उघड-झाप कराणारी झडप बंधारा बांधून देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही वा तातडीची उपाययोजना.

**मागणी क्रमांक: आय-५**
**मुख्य लेखाशीर्ष: ४७००, मोठे पाटबंधारे यावरील भांडवली खर्च**
**रूपये:- ८२,२३,१४,१३,०००/-**
**श्री. बळवंत वानखडे**

(२१) ४८७५ १० "चंद्रभागा बॅरेज बृहत लघु प्रकल्प, हा विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर अंतर्गत अमरावती जिल्हायातील बळीराजा जलसंजविनी योजनेअंतर्गत तसेच खारपान पटयातील दर्यापूर तालुक्यातील सांगवा गावलगत चंद्रभागा नदीवर प्रगतीपथावर असणे सदर योजनेचा प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्ताव नियामक मंडळाच्या दि.12/06/2019 रोजी झालेल्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवला असता प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव मा. मंत्री मंडळासमोर निर्णयान्वये सादर करणेबाबत (ठराव क्र.7414) ठराव करण्यात आलेला असणे , त्या अनुंषघाने सुप्रमा प्रस्ताव मा. मंत्री मंडळा समोर सादर करणेसाठी शासनाने दि.25/02/2021 रोजी मुद्दे उपस्थित केलेले असणे , कार्यकारी संचालक , विदर्भ

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | पाटबंधारे विकास महामंडळ यांचा अपर मुख्यसचिव, (जस.प्र.व.वि.) जलसंपदा विभाग मंत्रालय यांच्याकडे दि.25/02/2021 चा सदर प्रस्ताव शासनास सादर असणे. परंतु अद्यापपर्यंत सदर प्रकल्पास रू.305.31 कोटी किमंतीत प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे, यामुळे या भागातील शेतकऱ्यामध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. “ |
| | | | **मागणी क्रमांक: आय-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४७०१, मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- ५०,२२,०४,४१,०००/-**<br>**श्री. शिरीष चौधरी** |
| (२२) | ४९३१ | १० | रावेर ( जि. जळगाव ) सुकी मध्यम प्रकल्पाच्या उजव्या कालव्याचे बांधकाम सन १९८० मध्ये झालेले आहे; आजमितीस कालवे वितरकांना ४० वर्ष पुर्ण झालेले असणे, त्यावरील बांधकामे मोडकळीस आलेले असून माती भराव खचले असणे, सुरुवातीच्या भागातील डिप कट (खोल भागात) बाजूच्या कडा कोसळून मोठया प्रमाणात गाळ साचला असणे, हया सर्व कारणांमुळे सद्यस्थितीत ७५ क्यूसेक्स क्षमतेचा कालवा २५ क्यूसेक्स क्षमतेने चालू शकत नसणे, हया कालव्यावर सुमारे ३००० हेक्टर क्षेत्र असून कालव्यात वेळेवर पाणी न पोहचण्याने रोटेशन महिनाभर चालले व पुर्ण रब्बी हंगामात पुर्ण पाणीसाठा असून सुध्दा शेतक-यांना सिंचन सुविधा उपलब्ध होत नसणे, परिणामी ४० द.ल.घ.मी. जिवंत पाणीसाठयाचा फक्त २५ टक्के वापर होवून मोठया प्रमाणात पाणी नाश होत असल्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, या सर्व अडचणींवर मात करणेकरीता सुकी उजवा कालवा व खिरोदा १ ते ३. कळमोदा, न्हावी वितरीकाचे विशेष दुरुस्ती होणे आवश्यक असल्याने विशेष दुरुस्ती अंतर्गत कामे तातडीने करण्याबाबत करावयाची कार्यवाही व करावयाची उपाययोजना. |
| (२३) | ४९६० | १० | यावल (जि. जळगाव ) तालुक्यातील शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्प केंद्र शासनाच्या बळीराजा जलसंजिवनी योजने अंतर्गत समाविष्ट असून प्रकल्पाचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून चालु वर्षात २५% पाणीसाठा करण्यात आलेला असणे, सदर प्रकल्पाचा एकूण पाणीसाठा १६६.३६६ द.ल.घ.मी. इतका असून त्यापैकी सिंचनासाठी ८७.५९७ द.ल.घ.मी (३.०९२ टी.एम.सी)पाणी वापरातून यावल उपसा सिंचन योजना ( उद्भव शेळगांव बॅरेज) ता. यावल जि. जळगांव या उपसा प्रणालीद्वारे यावल तालुक्यातील १९ गावांतील ९१२८ हेक्टर सिंचन क्षेत्र भिजवण्याचे नियोजन असणे, शासन निर्णय दि. २३.११.२०१६ च्या मुद्दा क्रमांक १(६) आंतरराज्य लवादामुळे उपस्थित झालेल्या परिस्थितीला अनुसरुन आपल्या राज्यात अशा पाण्याचा जास्तीत जास्त वापर करुन घेणे या अटी मध्ये प्रस्तावित यावल उपसा सिंचन योजना मोडते तसेच यावल तालुक्यातील बहुतांश क्षेत्र CGWB अहवालानुसार भुजल वापर दृष्ट्या डार्क झोन ( Over Exploited Zone) मध्ये येते. तसेच शेळगाव बॅरेजच्या जलाशयापासून १६ किलोमीटर दूर व |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | १०० मीटर उंचीवरील यावल तालुक्यातील अधिसूचित क्षेत्राला शेतकरी वैयक्तिकरित्या पाणी उपसा करू शकत नसल्याबाबत लाभक्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतीने तापी पाटबंधारे बिभागास निवेदने दिलेली आहेत. त्याअनुषंगाने सदर सिंचन क्षेत्र भिजवण्यासाठी शासकीय खर्चाने यावल उपसा सिंचन योजना (उद्धव शेळगांव बॅरेज) ता. यावल जि.जळगांव रु.५९२.०१ कोटी किंमतीचा प्रस्ताव मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या तत्वतः मान्यतेसाठी दि.०३.०३.२०२२ रोजी तापी विकास महामंडळ जळगांव यांचेकडून शिफारशीसह शासनास सादर केलेला असणे, यावल तालुक्यामधील शेतक-यांच्या हितासाठी व रु. ९०० कोटी खर्च करुन बांधलेल्या शेळगाव बॅरेजमधील पाणीसाठ्याचा सिंचनासाठी वापर होण्याच्या दृष्टीने अधिसूचित झालेल्या लाभक्षेत्राला फायदा होण्याकरीता सदरची उपसा सिंचन योजना अत्यावश्यक असणे, महाराष्ट्र शासनाच्या Benchmarking Report नुसार सिंचन प्रकल्पासाठी पाण्याचे गृहीत धरलेल्या दरानुसार शेळगाव बॅरेजमधील पाणीसाठा विनावापर राहील्यास शासनाचे प्रति वर्ष सरासरी रु. ७० कोटी मिळकतीचे नुकसान होणार असणे, तापी खो-यातील पाणी उपलब्धतेनुसार तापी महामंडळाच्या वाट्याला आलेला १९९.०४ अ.घ.फु पाण्याचा पुरेपुर वापर होणे आवश्यक आहे. तसेच शेळगाव मध्यम प्रकल्पातील पाण्याचा लाभक्षेत्रातील शेतक-यांना पाण्याचा वापर होण्याच्या दृष्टीने शेळगाव बॅरेजवरील प्रस्तावित यावल उपसा सिंचन योजना होणे आवश्यक असूनही याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत करावयाची उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (२४) | ४९७८ | १० | पुरंदर उपसा योजनेची मुळ प्रशासकीय मान्यता दरसुची १९९५-९६ नुसार १७८.९३. कोटी व लाभार्थी गावांची संख्या ४९ व लाभक्षेत्र २०,६५० हेक्टर होते. त्यानंतर १९९९- २००० साली अधिकच्या टिपणीस मान्यता होवून योजना २५० कोटी पर्यत व लाभार्थी गावांची संख्या ५५ व लाभ क्षेत्र २५,१०० हेक्टर झाले. त्यानंतर २०/०१/२०१२ रोजी प्रथम सुधारीत प्रस्तावित शासनास सादर करून योजनेची किंमत ५४५.६६ कोटी रूपये इतकी होवून लाभार्थी गावांची संख्या ६३ व लाभ क्षेत्र २५,४९८ हेक्टर पर्यंत वाढले. त्यामध्ये जिल्ह्यातील हवेली (पुर्व भाग), दौंड, पुरंदर व बारामती तालुक्यातील २५, ४९८ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळण्यासाठी प्रकल्पावर माहे फेब्रुवारी, २०१९ रोजी पर्यंत ३९३.२६ कोटी रूपये खर्च झालेला असणे, दि. ३१ जानेवारी, २०२३ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णयाप्रमाणे ४६०.९५ कोटी रूपयांची पहिली सुधारीत प्रशासकीय मान्यता मंजुर करून फेब्रुवारी २०१९ रोजी पर्यंत खर्च झालेला ३९३.२६ कोटी रूपये वजा जाता उर्वरीत ६७.६९ कोटी खर्चास मिळालेल्या मान्यतेमधून पाण्याची गळती रोखण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याबरोबरच मुख्य वितरीका व इतर वितरीका (मायनर) यांच्यावरील एअरवॉल दुरूस्ती, स्कोअरवॉल, आयसोलेशनवालसह उर्ध्वगामिनलिका १ ते ६ टप्पे, साठवण बंधारा, पंप हाऊस, वितरण कुंड, देखभाल दुरूस्ती, यांत्रिक व विद्युत कामाची देयके, वितरण |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | व्यवस्थेतील ऑऊटलेट चेंबर, व्हॉल्हव चेंबर, स्कोअर व्हॉल्हव, ऑफिस इमारती इत्यादी कामांकरीता निधी उपलब्ध करण्याची मागणी होत असतानाही याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (२५) | ४९०२ | १०० | मध्य गोदावरी उपखोरे अंतर्गत परळी तालुक्यातील करेवाडी साठवण तलाव प्रस्तावित असणे व या प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यास या भागातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येणे अपेक्षित असणे, यासाठी 20 कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२६) | ४९०३ | १०० | मध्य गोदावरी उपखोरे अंतर्गत परळी तालुक्यातील अस्वलांबा साठवण तलाव प्रस्तावित असणे व या प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यास या भागातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येणे अपेक्षित असणे, यासाठी 16 कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२७) | ४९०४ | १०० | मध्य गोदावरी उपखोरे अंतर्गत परळी तालुक्यातील खोडवा सावरगाव साठवण तलाव प्रस्तावित असणे व या प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यास या भागातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येणे अपेक्षित असणे, यासाठी 21 कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२८) | ४९०५ | १०० | मध्य गोदावरी उपखोरे अंतर्गत परळी तालुक्यातील दौनापूर साठवण तलाव प्रस्तावित असणे व या प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यास या भागातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येणे अपेक्षित असणे, यासाठी 36 कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२९) | ४९०६ | १०० | ा मध्य गोदावरी उपखोरे अंतर्गत परळी तालुक्यातील तडोळी साठवण तलाव प्रस्तावित असणे व या प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यास या भागातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येणे अपेक्षित असणे, यासाठी 12 कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३०) | ४९०७ | १०० | मध्य गोदावरी उपखोरे अंतर्गत परळी तालुक्यातील वाका साठवण तलाव प्रस्तावित असणे व या प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यास या भागातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येणे अपेक्षित असणे, यासाठी 15 कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३१) | ४९०८ | १०० | मध्य गोदावरी उपखोरे अंतर्गत परळी तालुक्यातील कन्हेरवाडी साठवण तलाव प्रस्तावित असणे व या प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यास या भागातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येणे अपेक्षित असणे, यासाठी 28 कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३२) | ४९०९ | १०० | मध्य गोदावरी उपखोरे अंतर्गत परळी तालुक्यातील गोवर्धन तांडा साठवण तलाव |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|

प्रस्तावित असणे व या प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यास या भागातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येणे अपेक्षित असणे, यासाठी 28 कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना.

**मागणी क्रमांक: आय-५**
**मुख्य लेखाशीर्ष: ४७०२, लहान पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च**
**रूपये:- २१,८५,१४,९६,०००/-**
**श्री. राजेश टोपे**

(३३) ४९६१ १० जालना जिल्हयातील माझ्या घनसावंगी मतदार संघातील हातवन बृहत ल.पा.तलाव प्रकल्प ता.जालना ही योजना गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद अंतर्गत सर्वसाधारण क्षेत्रातील असून जालना जिल्हयातील गोदावरी खोऱ्यांतील दुधना उपखोऱ्यात हातवन गावाजवळील कुंडलिका या नदीवर दिनांक 07.05.2010 रोजी सुरु करण्यात आले आहे. प्रकल्पासाठी जालना तालुक्यातील मौजे.हातवन, बापकळ, भाटेपुरी, वडीवाडी येथील 714.15 हे जमीन संपादित झालेली असून अद्यापही सदर संपादित जमिनीचा शेतकऱ्यांना मोबदला न मिळणे. शासन निर्णय क्र. सुप्रमा-2019 दिनांक 08.07.2021 नुसार सदर प्रकल्पाचे भुसंपादन, भुसंपादन अधिनियम 2013 अन्वये प्रस्तावित करुन सदर प्रकल्पास 297.39 कोटी इतक्या किमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता मिळुन, लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांनी मागणी करुन हि अद्यापही कोणतीही कार्यवाही न करणे. तसेच मौजे. बापकळ ता. जालना येथील पुर्ण गावाचे पुर्नवर्सन करण्यासाठी पर्यायी जागेची व्यवस्था न करणे. परिणामी या परिसरातील शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती असंतोष व निराशेचे वातावरण तयार होणे. शासनाने प्रकल्पातील बाधीत शेतकऱ्यांना तात्काळ मावेजा देण्याची आवश्यकता याकडे शासनाचे दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

**मागणी क्रमांक: आय-५**
**मुख्य लेखाशीर्ष: ४७११, पूरनियंत्रण व जलनिस्सारण**
**रूपये:- २,०८,६१,०४,०००/-**
**श्री. बळवंत वानखडे**

(३४) ४८९२ १० दर्यापूर मतदारसंघ हा संपूर्णतः खारपण पट्ट्याचा भाग असून येथे मोठ्या प्रमाणात काळ्या मातीचा भाग असल्याने दरवर्षी येणाऱ्या पावसाच्या पाण्याने ग्रामीण भागातील गावातून जात असलेल्या असलेल्या भुलेश्वरी, चंद्रभागा, शहानुर, पुर्ना या नद्या व यांच्या उपनद्याच्या तसेच नाल्याच्या काठावरील जमिनीची धूप होत असल्याने नदी व नाल्याच्या काठावरील घरांना मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झालेला असणे , यात प्रामुख्याने दर्यापूर तालुक्यातील सुकळी , टोंगलाबाद , लोतवाडा , तेलखेडा , उमरी इतबारपूर या गावातील नदीकाठावरील घरांना मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झालेला असून आगामी पावसाळ्यात या गावात जीवित तसेच वित्तहानी होण्याची दाट शक्यता निर्माण झालेली असणे, येथील पुरसरंक्षण भिंत बांधकाम करण्याबाबत संबधीत यंत्रनेकडून जिल्हा प्रशासनास

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अंदाजपत्रकासह प्रस्ताव सादर असणे , परंतु अद्यापही सदर प्रस्तावास कोणताही प्रकारची मान्यता दिलेली नसणे , यामुळे संबधीत गावातील नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १४ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) जलसंपदा विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई